क्र.पोमंस/११/२२/६/शिक्षा सुधारणा/६७/२०२१
पोलीस महासंचालक म.रा., मुंबई यांचे
कार्यालय, शहिद भगतसिंग मार्ग,
कुलाबा, मुंबई-४०० ००१
दि. ०९/०७/२०२१

**पोलीस महासंचालक यांचे स्थायी आदेश क्र.०१/२०२१**

विषय :- महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ मधील कलम २५ (१-क) (घ) आणि महाराष्ट्र पोलीस (शिक्षा व अपीले) नियम, १९५६ मधील नियम ३ (२) (iv) मध्ये नमूद दंडाच्या शिक्षेचे आदेश निर्गमित करण्याकरिता मार्गदर्शक सूचना...

महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ आणि त्याअंतर्गत तयार करण्यात आलेले महाराष्ट्र पोलीस (शिक्षा व अपिले) नियम, १९५६ मधील तरतुदींनुसार पोलीस शिपाई ते पोलीस निरीक्षक दर्जांच्या पोलीस कर्मचारी आणि अधिकाऱ्यांविरुध्द शिस्तभंग विषयक कारवाई करण्यात येते. महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ मधील कलम २५ आणि महाराष्ट्र पोलीस (शिक्षा व अपिले) नियम, १९५६ मधील नियम ३ नुसार शिक्षा देण्याची तरतुद आहे. त्यामधील--

(१) महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ मधील कलम २५ (१-क) (घ) आणि महाराष्ट्र पोलीस (शिक्षा व अपीले) नियम, १९५६ मधील नियम ३(२)(iv) नुसार पोलीस शिपाई ते सहायक पोलीस निरीक्षक दर्जाच्या पोलीस कर्मचारी आणि अधिकाऱ्यांना द्रव्यदंड (fine) देण्याची तरतुद आहे. त्या शिक्षेची कमाल मर्यादा एक महिन्याच्या पगाराहून अधिक होणार नाही, अशी आहे,

(२) त्याचप्रमाणे शिक्षा देताना कोणती कार्यपध्दती अवलंबावी याबाबतची माहिती महाराष्ट्र पोलीस (शिक्षा व अपीले) नियम, १९५६ मधील नियम ४ मध्ये विषद करण्यात आलेली आहे,

(२अ) महाराष्ट्र पोलीस (शिक्षा व अपिले) नियम १९५६ मधील ४(२) मध्ये, *नियम ३ च्या उपनियम (२) मधील पोटनियम (i), (ii), (iv), (v) आणि (vi) मध्ये निर्दिष्ट शिक्षा देतांना असे आदेश निर्गमित करण्यापुर्वी संबंधीतास त्या प्रकरणांत त्याचे म्हणणे अभिवेदनाद्वारे मांडण्याची पुरेशी संधी द्यावी व असे केलेले अभिवेदन त्या प्रकरणांत अंतिम आदेश निर्गमित करण्यापुर्वी विचारात घेण्यात यावे*, असे नमूद आहे. तसेच,

(२ब) महाराष्ट्र पोलीस (शिक्षा व अपिले) नियम १९५६ मधील नियम ४(२) च्या परंतुक मध्ये, *नियम ४ चा उपनियम २ मधील आवश्यक नैसर्गिक न्यायदानाचे तत्वाचे पालन करणे अडचणीचे होत असेल आणि त्याचे पालन न केल्यामुळे संबंधीतांवर अन्याय होणार नसेल तर नियम ४ मधील उपनियम २ मध्ये नमूद केलेल्या तरतुदींचा वापर हा योग्य ते त्याबाबतची लिखीत स्वरुपाची कारणे नोंदवून क्षमापीत करता येईल*, असे नमूद आहे.

(३) अ.क्र.१ मध्ये नमुद दंड देतांना साधारणपणे कमाल मर्यादा काय असावी तसेच अ.क्र.२ मध्ये नमूद नियम ४(२) चा वापर कसा करावा याबाबत मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्याची बाब या कार्यालयाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने पुढीलप्रमाणे मार्गदर्शक सुचना देण्यात येत आहेत:-

(३अ) पोलीस अधिकारी / कर्मचारी यांनी त्यानी केलेल्या कसुरीबाबत शिक्षा देण्याचा मुख्य उद्देश त्यांचेमध्ये सुधारणा व्हावी आणि कसुरदार परत चूक करणार नाही असा आहे. शिक्षेमुळे कसुरदारास आर्थिक झळ बसावी हे उद्दिष्ट नाही. त्यामुळे शिक्षेबाबतची अ.क्र. १ मध्ये नमूद तरतुदी वापरतांना कसुरदारास आर्थिक झळ बसणार नाही, परंतु कसुरदारामध्ये सुधारणा होईल, अशी शिक्षा देणे अपेक्षित आहे. एक महिन्याचा पगार इतका दंड केल्यास कसुरदारास खूपच आर्थिक झळ सोसावी लागते. म्हणून असे सुचित करण्यात येते की, साधारणत: दंड (fine) ही शिक्षा कसुरदाराच्या एक महिन्याच्या पगाराच्या १०% पेक्षा जास्त नसावी.

(३ब) कसूरीच्या प्रकरणात निर्णय घेताना नैसर्गिक न्याय तत्वानूसार कूसरदाराची बाजू ऐकून आणि त्याचा विचार करुन प्रकरणात निर्णय घेणे अपेक्षित आहे. त्यामुळे महाराष्ट्र पोलीस (शिक्षा व अपिले) नियम १९५६ मधील नियम ४(२) चे परंतुक चा उपयोग शिक्षा बद्दल निर्णय घेताना करु नये, असे याद्वारे सूचित करण्यात येत आहे.

**( संजय पांडे )**
पोलीस महासंचालक
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, दहशतवाद विरोधी पथक / प्रशिक्षण व खास पथके / लोहमार्ग /वाहतुक / विशेष कृती /नागरी हक्क संरक्षण / राज्य राखीव पोलीस बल, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
अपर पोलीस महासंचालक व संचालक, पोलीस बिनतारी संदेश, महाराष्ट्र राज्य, पुणे.
सर्व पोलीस आयुक्त.
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक व पोलीस उप महानिरीक्षक.
संचालक, महाराष्ट्र पोलीस प्रबोधिनी, नाशिक.
संचालक व विशेष पोलीस महानिरिक्षक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे.
विशेष पोलीस महानिरीक्षक, (नविअ), नागपूर.
विशेष पोलीस महानिरीक्षक, सुरक्षा, दादर, मुंबई.
विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
पोलीस उप महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे / नागपूर.
सर्व पोलीस अधीक्षक.
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट १ ते १६.
सर्व प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्र.
उपसंचालक, डी.टी.एस., नाशिक.
कार्यासन अधिकारी, का.क्र.११-अ, १२, व १३.

प्रत, महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, गुन्हा अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.